CMYK

आमदार नव्हे, दोन-चार मंत्र्यांना कापा: तुपकरांचे वादग्रस्त विधान >>पान 2

फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा >>पान 3

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडूंनी लावला दम! >>पान 4


**सुविचार**
कष्टाशिवाय फळ मिळत नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 86 ■ बुधवार, दि. 29 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

अप्पी आमची कलेक्टर फेम अभिनेत्रीचा झाला साखरपुडा
आतील पान

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी!

# ८ व्या वेतन आयोगाला केंद्राची मंजूरी, ५० लाख कर्मचाऱ्यांना होणार फायदा

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मंजुरी दिली आहे. आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेपासून १८ महिन्यात शिफारशी केंद्र सरकारला सादर कराव्या लागणार आहेत. आठवा वेतन आयोग लागू झाल्यास याचा ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना फायदा होईल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली.**



आठवा केंद्रीय वेतन आयोग ही तात्पुरती संस्था आहे. या आयोगाला एक अध्यक्ष असेल, एक सदस्य (अर्धवेळ) आणि एक सदस्य सचिव असेल. या आयोगाची स्थापना जेव्हा होईल त्या तारखेपासून १८ महिन्यात शिफारशी सादर कराव्या लागतील. जर आवश्यकता असेल तेव्हा अंतिम शिफारशी सादर केल्यानंतर एखाद्या बाबीवर अंतरिम रिपोर्ट देखील द्यावा लागेल.

आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी सादर करताना अध्यक्ष, सदस्य, सचिव यांना देशातील आर्थिक स्थिती आणि वित्तीय विवेकाची गरज, विकासात्मक खर्च आणि कल्याणकारी उपाययोजना राबवण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत का याची खात्री करण्याच गरज, योगदान न देणाऱ्या निवृत्तीवेतन योजनांचा विनाअनुदानित खर्ज, आठवा वेतन आयोग काही शिफारशींसह जी राज्य सरकारं स्वीकारतील त्यांच्या आर्थिक स्थिती जो परिणाम होऊ शकतो त्याचा विचार करणं. केंद्राच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेली सध्याची वेतन रचना, फायदे आणि कामाची परिस्थिती याचा विचार करावा लागेल.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आठव्या केंद्रीय वेतन आयोगाची रचना, टर्म्स ऑफ रेफरन्स, आयोगाच्या कामाचा कालावधी या गोष्टींना मान्यता दिल्याची माहिती दिली. हा खूप महत्त्वाचा निर्णय आहे, असं अश्विनी वैष्णव म्हणाले. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा फायदा ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना होईल, असं अश्विनी वैष्णव म्हणाले.

सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई या आठव्या वेतन आयोगाच्या अध्यक्ष असतील. आयआयएम बंगळुरुच्या प्राध्यापक पलक घोष या सदस्य (अर्धवेळ) असतील. तर, पेट्रोलियम आणि नॅचुरल गॅस विभागाचे सचिव पंकज जैन हे सदस्य सचिव असतील. दरम्यान, केंद्र सरकारनं आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यानंतर तो १ जानेवारी २०२६ पासून लागू होऊ शकतो. तर, आयोगाच्या स्थापनेला मंजुरी केंद्रानं जानेवारी महिन्यात दिली होती.

## ठाण्यात मनसेच्या बॅनरमुळे राजकीय चर्चांना उधाण



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** मनसेकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच घराच्या काही अंतरावर नितीन कंपनी चौकात लावण्यात आलेला एक बॅनर सध्या राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आहे. या बॅनरवर स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या तिघांना एकत्र आणत महाराष्ट्राचं स्वप्न साकार झाल्याचं भाकीत करत आहे. विशेष म्हणजे या बॅनर वर तिघांच्या फोटो मागे महाराष्ट्राचा नकाशा काढत मोठ्या संख्येने कार्यकर्ते जल्लोष करताना दाखवण्यात आले आहेत.

## ऑनलाईन साखरपुडा! मुलगा लंडनमध्ये, मुलगी वैजापूरमध्ये; छत्रपती संभाजीनगरात पार पडला अनोखा सोहळा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** इंटरनेटद्वारे जग जवळ आलय. कितीही दूर असलेली व्यक्ती अगदी काही सेकंदात आपल्या समोर दिसायला लागते. इतकंच काय तर समाज माध्यमांवर संपर्क वाढवण्याच्या वेगवेगळ्या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून मैत्री आणि प्रेम जुळल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. मात्र कदाचित पहिल्यांदाच ऑनलाईन पद्धतीनं सातासमुद्रापार असलेल्या मुलांसोबत चक्क साखरपुड्याचा विधी पार पडला. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम मागील म हिन्यात पार पडला. मात्र मुलाला सुट्टी नसल्यानं आगळ्यावेळ्या पद्धतीनं साखरपुड्याचा सोहळा करण्यात आला. त्यावेळी वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे यांनी मुलाला प्रश्न विचारले आणि ऑनलाईन साखरपुडा पार पडला. विशेष म्हणजे यावेळी सगळी पाहुणे मंडळी मंडपात आली तर, मुलानं ऑनलाईन पद्धतीनं साखरपुड्याला हजेरी लावली होती.

## उधार घेतलेले पैसे दिले नाहीत, पनवेलमध्ये ५५ वर्षाच्या विधवेचा गळा आवळून केली हत्या

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** उधार घेतलेले पैसे परत न केल्याने हत्या केल्याची घटना पनवेल पोलिस ठाण्याचा हद्दीत घडली आहे. या प्रकरणी परिसरातील २३ वर्षीय डेअरी व्यावसायिक मोहम्मद समीर अल्लाउद्दीन अन्सारी यास अटक केली आहे . २५ ऑक्टोबर रोजी सकाळी अकरा कुंडेवहाळ एका महिलेचा गळा आवळून खून करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता ५५ वर्षीय संगिता नाम देव म्हात्रे या महिला मृत अवस्थेत आढळून आल्या. तपासादरम्यान महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचं आढळले. तपासादरम्यान मोहम्मद समीर अल्लाउद्दीन अन्सारी याच्याकडे चौकशी केली असता, त्याने महिलेचा खून केल्याची कबुली दिली.

## बंजारा आरक्षणाचा मुद्दा पेटला, तरुणानं उचललं टोकाचं पाऊल, सरकार जबाबदार असल्याचा उल्लेख

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. पांगरी गावात बंजारा समाजातील तरुणाने आरक्षणाच्या मागणीसाठी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रवीण बाबुराव जाधव असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षण मिळावे, या मागणीसाठी प्रवीण जाधव काही काळापासून सक्रिय होता.

## नागपूर पोलीस मुख्यालयातील शिपायाकडून तरुणीचा लैंगिक छळ, फलटणच्या घटनेची पुनरावृत्ती


दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** सातारातल्या फलटणमधील महिला डॉक्टरचा लैंगिक छळ आणि आत्महत्येचे हे प्रकरण ताजे असताना आता असाच प्रकार नागपुरातही उघडकीस आला. एका २३ वर्षीय तरुणीने पोलीस शिपायावर लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप केल्याने पोलीस आयुक्तालयात खळबळ उडाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे हा शिपाई मुख्यालयात कर्तव्यावर तैनात आहे. लग्नाचे आमिष दाखवून तो आपल्यावर दिड वर्षापासून लैंगिक अत्याचार करत असल्याची तक्रार तरुणीने पोलीस आयुक्तालयांकडे केली आहे. या प्रकरणी तीन आठवड्यांपूर्वी ही तरुणी पोलीस ठाण्यात फिर्यादही घेऊन गेली होती. मात्र तिला ठाण्याने पिटाळून लावले. त्यानंतर तरुणीने पोलीस आयुक्तालयांकडे दाद मागितली. आयुक्तांनी हे प्रकरण भरोसा सेलकडे पाठवले. तेथेही तडजोड न झाल्याने अखेर तरुणीच्या तक्रारीवरील कपीलनगर पोलिसांनी पोलीस शिपायाविरोधात गुन्हा दाखल केले.

# जळगावात एकनाथ खडसेंच्या घरात चोरी, सोन्यासह रोकड लांबवली

### काही दिवसांपूर्वीच रक्षा खडसेंच्या पेट्रोल पंपावरही पडला होता दरोडा

दैनिक आपला विदर्भ



**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव शहरातील शिवराम नगर भागातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या मुक्ताई बंगल्यात चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकारामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वीच केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुक्ताईनगर येथील पेट्रोल पंपावर सशस्त्र दरोडा टाकण्यात आला होता. यानंतर काहीच दिवसांनी एकनाथ खडसे यांच्या निवासस्थानी चोरी झाली आहे. सहा ते सात तोळे सोने व ३५ हजाराची रोकड लंपास करण्याची माहिती मिळत आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, एकनाथ खडसे हे सध्या मुक्ताईनगर येथे वास्तव्यास असल्याने त्यांचा जळगावातील बंगला बंद होता. सकाळी त्यांच्या कर्मचाऱ्याने नियमितपणे बंगल्याची पाहणी करण्यासाठी तेथे गेल्यावर घराचे कुलूप तुटलेले आणि घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर कर्मचाऱ्याने तत्काळ खडसे यांना माहिती दिली. खडसे यांनी लगेचच पोलिसांना घटनेची खबर दिली असून, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

एकनाथ खडसे म्हणाले की, रात्री घरफोडी झालेली आहे. बंगल्यातील सर्व रूमचे कुलुपं तोडून चोरी केलेली आहे. काही सामानाची चोरी झाली आहे. माझ्या रूममध्ये ३५ हजार रुपये होते. पाच-पाच ग्रॅमच्या चार अंगठ्या होत्या. त्या चोरीला गेलेल्या आहे. खाली आमचे नातेवाईक राहत होते. त्यांचे पाच तोळे सोने चोरीला गेलेले आहे. घरात कोणी नाही याचा फायदा घेऊन चोरी केल्याचे दिसून येते. पोलिसांचा जळगाव जिल्ह्यात धाक उरलेला नाही. चोऱ्या, दरोडा, असे प्रकार सातत्याने होत आहेत. दोन नंबरचे धंदे वाढलेले आहेत. पोलिसांवर काही टीका केली तर तिथले स्थानिक मंत्री माझ्यावरच टिंगल करतात. काहीतरी वेगळाच अर्थ करतात. घटनेचे गांभीर्य पोलिसांना आणि सरकारला नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

दरम्यान, ९ ऑक्टोबरच्या रात्री मुक्ताईनगर व वरणगाव परिसरातील तीन पेट्रोल पंपांवर सशस्त्र दरोडे टाकण्यात आले होते. यामध्ये मुक्ताईनगर येथील रक्षा फ्युअल (केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मालकीचा पेट्रोल पंप), कर्की फाटा येथील 'मनुभाई आशीर्वाद' आणि तळवेल फाटा येथील 'सय्यद पेट्रोल पंप' या ठिकाणांचा समावेश होता. त्या रात्री बंदुकीचा धाक दाखवत आरोपींनी रोख रक्कम, मोबाईल फोन आणि सीसीटीव्ही डीव्हीआर मिळून सुमारे १ लाख ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जळगाव पोलिसांच्या गुन्हे शाखेने विशेष तपास पथक स्थापन केले होते. तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाइल लोकेशनच्या आधारे पोलिसांनी नाशिक व अकोला जिल्ह्यात छापे टाकले. या कारवाईत पोलिसांनी सचिन भालेराव, पंकज गायकवाड, हर्षल बावस्कर, देवेंद्र बावस्कर, प्रद्युम्न विरघट आणि एका विधी संघर्षित बालकाला अटक केली होती.

## उमेदवारांना जात वैधतेसाठी मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

### 'विकसित महाराष्ट्र २०४७' लाही हिरवा कंदील; महाराष्ट्र मंत्रिमंडळ निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (२८ ऑक्टोबर) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी मंत्रालयात नवीन सेलची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थापना आहे. मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत मान्यता देखील मिळाली आहे. आएफएस राजेश गावंडे यांची नियुक्ती केल्यानंतर आज मंत्रिमंडळ बैठकीच्या समोर हा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. आता मंत्रालयातील राजशिष्टाचार अधिकारी यांना मिळणार अधिकची जबाबदारी मिळणार आहे. राजशिष्टाचार सोबतच परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि आंतरराष्ट्रीय संबंध आणि संपर्क याची ही जबाबदारी असणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या पदाला नव्याने मान्यता देण्यात आली. >>पान ३

# 'वरळीच्या मतदार यादीत सर्वात मोठा घोटाळा', आदित्य ठाकरेंनी दाखवली संपूर्ण मतदार यादी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बोगस सरकारचे बोगस म तदार'या मथळ्याखाली आदित्य ठाकरे यांचे मतदार याद्यांमधील घोळाबाबत सादरीकरण पार पडले. ठाकरेंच्या शिवसेना निर्धार मेळाव्यात आदित्य ठाकरेंनी सादरीकरण केले.वरळी मतदार संघात देखील बोगस मतदान झाल्याची माहिती आदित्य ठाकरेंनी यावेळी दिली. दिल्लीत राहुल गांधी यांनी ज्या प्रकारे सादरीकरण केलं,अगदी तशाच प्रकारे मुंबईतील मतदार यादीतील घोळाचा सादरीकरण आदित्य ठाकरेंनी केले. मुंबईच्या मतदार याद्यातील घोटाळा सादरीकरणाच्या माध्यमातून आदित्य ठाकरे उघड केला. मुंबईत शिवसेनेने आदित्य ठाकरे यांच्या पुढाकाराने मतदार याद्यांची स्वतंत्रपणे छाननी केली असून त्यात प्रचंड घोळ असून तो कशा पद्धतीने करण्यात आला? आणि आगामी महापालिका निवडणुकीत बोगस मतदान होऊ नये यासाठी काय खबरदारी घ्यायची आहे याचा मार्गदर्शन आदित्य ठाकरेंनी केले. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

शिवसेना (उबाठा) च्या निर्धार मेळाव्यात युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी मतदार याद्यांतील मोठा घोटाळा उघड करत 'बोगस सरकारचे बोगस मतदार' असा घणाघात केला. वरळी येथील एनएससीआय डोममध्ये सोमवारी (२७ ऑक्टोबर २०२५) झालेल्या या मेळाव्यात ठाकरे यांनी सादरीकरण करत मुंबई म हापालिका निवडणुकीपूर्वी वोटचोरी रोखण्याचा निर्धार व्यक्त केला. लोकसभेत २,५२,९७० ते विधानसभेत २,६३,३५२ मतदारांपर्यंत वाढ झाली असून, १६,०४३ नवीन मतदार जोडले गेले, तर ५,६६१ काढले गेले. यात १९,३३३ मतदार गडबडीत आहेत, असा खळबळजनक दावा केला.

ठाकरे म्हणाले, ''सगळीकडे वोटचोरी म्हणजे निवडणूक चोरी. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सरकार येणार वाटत होती, पण तेव्हा हा घोटाळा पकडता आला नाही. ही लढाई फक्त प्रचारातून होणार नाही, तर मतदारयादी हातात घेऊन होईल. प्रत्येकाने यादीचे वाचन करावे.'' वरळीत २२-२३ हजार मतदारांची गडबड असल्याचे सांगत, मुंबईत लाखो असे असतील, असा इशारा दिला. निवडणूक आयोग भाजपचे काम करत असल्याने आम्हाला त्यांचे कर्तव्य पार पाडावे लागेल, असेही त्यांनी नमूद केले.

सादरीकरणात ठाकरे यांनी धक्कादायक आकडेवारी मांडली. ''मतदाराचे नाव आणि वडिलांचे नाव एकसारखे असलेले ५०२ मतदार सापडले. म्हात्रे नावाच्या मतदाराचे वडील पटेल असलेले ७२० आहेत. महिलांचे लिंग पुरुष म्हणून नोंदलेले ६४३ आहेत.'' एपिक नंबर नसलेले २८ आणि समान एपिक असलेले १३३ मतदार असल्याचे सांगत, सेम व्यक्तीला वेगळे एपिक देण्याची उदाहरणे दिली. नरहरी कुलकर्णी लोकसभेत मृत म्हणून काढले गेले, पण विधानसभेत परत आले आणि मतदान केले, असा प्रकारही आदित्य ठाकरेंनी उघड केला.



''१०० वर्षांपेक्षा जास्त वयाचे ११३ मतदार वरळीत आहेत. जास्त जगायचे असेल तर वरळीत या!'' असा टोला मारत ठाकरे म्हणाले, चौकशीत कळते की काही मृत झाले तरी नावे कायम आहेत आणि मतदान झाले असावे. विधानसभेनंतर १,२०० मतदार डिलीट झाले, पण त्यांचे मतदान झाल्याचा संशय आहे. फोटोंचा प्रॉब्लेम असून, काहींचे फोटोच नाहीत, तर कार्डवर तीन भाषांमध्ये लिहिले आहे, असा आरोप आदित्य ठाकरेंनी केला.

ठाकरे यांनी व्हिडिओ दाखवत सांगितले, ''घर नंबर झो झो लिहिले, आकडे का नाहीत? पत्ता नसलेले ४,००० हून अधिक मतदार आहेत.'' एका छोट्या घरात ३८ मतदार दाखवले जाणारे २१४ घरे आहेत. घसिटराम हलवाई दुकानात ४८ मतदार नोंदले गेले. ''हा वोटिंग फ्रॉड आहे. मुंबईला अदानीस्तान होण्यापासून रोखायचे असेल तर हे घोटाळे उघड करा, असे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले.

ठाकरे म्हणाले, ''माझी जबाबदारी म्हणजे माझी यादी. डुप्लिकेट नावे, मृत लोक, फोटो, पत्ता यांची तपासणी करा. एकाच पत्त्यावर अनेक का?'' हे सादरीकरण करताना उपशाखाप्रम ुखांना आवाहन केले की, मुंबई जिंकण्यासाठी प्रत्येकाने भूमिका बजावावी. मेळाव्यात उद्धव ठाकरे यांचे मार्गदर्शन झाले, तर संजय राऊत यांनीही मतचोरीचे पुरावे २७ तारखेला बघण्याचे सांगितले. यावेळी आदित्य ठाकरेंनी १ नोव्हेंबरला मोर्चाची घोषणा केली. ''मतदार यादीतील घोटाळे रोखा, अन्यथा बोगस मतदानाने परिणाम बदलतील, असे ते यावेळी म्हणाले.

CMYK

>>पान २

## जागतिक इंटरनेट दिन

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या श्रेस ळप शब्दापैकी श्रे शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.

# कर्जमाफीसाठी शेतकरी संघटनांचा नागपुरात मोर्चा

# आमदार नव्हे, दोन-चार मंत्र्यांना कापा: तुपकरांचे वादग्रस्त विधान

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांनो आत्महत्या करण्यापेक्षा आमदाराला कापा, असे विधान काही दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी केले होते. आता शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी त्यापुढेही जाऊन आमदाराऐवजी दोन-चार मंत्र्यांना कापा, पण मागे हटू नका, असे वादग्रस्त आवाहन शेतकऱ्यांना केले आहे. आम्ही भीक मागायला आलेलो नाही; कर्जमाफी हा आमचा नैतिक हक्क असल्याचे रविकांत तुपकर म्हणाले. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात नागपूरमध्ये काढलेल्या मोर्चात रविकांत तुपकर बोलत होते.

शेतकरी कर्जमाफी आणि वाढत्या आर्थिक अडचणींविरोधात प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आज नागपुरात भव्य मोर्चा काढण्यात आला. सरकारने दिलेल्या अल्टिमेटमची मुदत संपताच निघालेल्या या मोर्चात स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि इतर संघटनांचे हजारो शेतकरी सहभागी झाले. मोर्चामुळे नागपूरहैदराबाद महामार्ग काही काळ ठप्प झाला. या आंदोलनानंतर आता बच्चू कडू कोणती नवी भूमिका मांडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमकपणे भाषण करत, राज्य सरकार आणि मंत्र्यांवर सडकून टीका केली.

महाराष्ट्रातील आम्ही सर्व शेतकरी नेते एकत्र आहोत. ही एक अभूतपूर्व गोष्ट या ठिकाणी घडताना दिसत आहे.

### आमदार नाही, दोन-चार मंत्र्यांना कापा

आम्ही काही फक्त बोलबच्चन नाही. आम्ही जे बोलतो ते करतो. लोक म्हणतात की शेतकऱ्यांचे मजबूत संघटन होऊ शकत नाही. पण तुम्ही दाखवून दिले की, शेतकरीही एकत्र येऊ शकतात. इथून पुढे आत्महत्या करायच्या नाहीत. कितीही संकटे आली तरी जीवन संपवायचे नाही. बच्चू भाऊंनी सांगितले की, आमदाराला कापा. मी त्या पुढे जाऊन सांगतो की दोन-चार मंत्र्यांना कापा. पण आता मागे हटायचे नाही. मरायचं तर आजिबात नाही.

### सरकार चर्चेला कसे येत नाही, ते पाहूच

युद्धामध्ये काही झाल्यास नेत्याचा आदेश शिरसावंद्य असतो. त्यामुळे इथले नेते जो काही आदेश देतील, त्याची अंमलबजावणी करा. घरी फोन करून सांगा, कर्जमाफी केल्याशिवाय माघारी येणार नाही. त्यामुळे आता सरकार कसे चर्चेला येत नाही ते आपण पाहूच. शेतकऱ्यांची एकजुट झालेली वज्रमुठ सोडू नका. इंग्रज माजले म्हणून महात्मा गांधी, भगतसिंहांचा जन्म झाला. अण्णा हजारेंनी आंदोलन केल्याने केजरीवाल दोन-तीन वेळा मुख्यमंत्री झाले. आता राज्यातील सरकार माजलं म्हणून इथले नेते जन्माला आले आहेत असे समजा, असे रविकांत तुपकर म्हणालेत.




आम्ही वेगवेगळ्या भागात लढतो. पण शेतकऱ्यांची वज्रमूठ एका ठिकाणी आणण्याचे काम बच्चू कडू यांनी केलं आहे. हा मोर्चा अशा ठिकाणी आणला आहे की, समृद्धी महामार्ग बंद, हैदराबाद-जबलपूर मार्ग बंद सगळे रस्ते बंद केले आहेत. बच्चू कडू यांनी फार सर्वे क्षण केलेले आहे. कारण इथून एकही गाडी पास होणार नाही. सरकारचे नाक दाबल्याशिवाय सरकारचे तोंड उघडत नाही, असे रविकांत तुपकर म्हणाले.

आज सोयाबीन साडेतीन ते चार हजार रुपयांनी विकले जात आहे. सोयाबीनचे एक क्विंटल उत्पादनासाठी साडे सात हजार रुपये खर्च येतो आणि बाजारात तीन ते साडेतीन हजार रुपये भाव मिळत आहे. कापसाची देखील तीच अवस्था आहे. केंद्र सरकारने सोयाबीन निर्यात केली नसल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सोयाबीनची निर्यात केल्यास त्याला ८००० भाव मिळेल. कापूस आयातीपेक्षा कापूस निर्यात करा. आमच्यामुळे आमच्यावर कर्ज झाले नाही तर तुमच्या धोरणांमुळे आम्ही कर्जबाजारी झालो आहे. तुम्ही कापूस, ऊस शेतकऱ्यांना लुटला आणि आम्ही कर्जबाजारी झालो, असा आरोप रविकांत तुपकर यांनी सरकारवर केला.


जातीचा मोर्चा निघाला की सरकार आंदोलनस्थळी चर्चेसाठी येते. मग आज आमच्या मातीचा मोर्चा निघाला तर तुम्ही इथे का येऊ शकत नाहीत? हा आमचा सरकारला सवाल आहे. आम्ही तुमच्या दारात येणार नाहीत. तुम्हाला चर्चा करायला शेतकऱ्यांच्या दारात नागपूरच्या वेशीवर यावे लागेल, असे रविकांत तुपकर म्हणाले.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे सांगतात की, बैठक बोलावली होती पण चर्चेला आले नाहीत. सरकारने निवडणुकीच्या आधी कर्जमाफीची घोषणा केली होती. आता त्याला एक वर्ष झाले तरी त्यावर काहीच बोलत नाहीत. आम्ही भीक मागायला आलो नाहीत. सोयाबीनला भाव देता येत नाही. सोयाबीन निर्यात होत नाही. परदेशात निर्यात करा. सोयाबीनचे योग्य भाव मिळतील. कापसाची आयात करण्यापेक्षा निर्यात करा. कर्जमुक्ती हा आमचा नैतिक अधिकार आहे'', असं तुपकर म्हणाले.

नेपाळमध्ये जसे मंत्र्यांना तुडवून तुडवून हाणले, नेपाळचे मंत्री देश सोडून पळून गेले. लक्षात ठेवा. मी तर बच्चू भाऊंना म्हणेन, नागपूरनंतरचा चौथा टप्पा मुंबईचा ठेवा. सा***, हरामखोरांना मुंबई आणि महाराष्ट्रातून जावे लागले पाहिजे. त्याशिवाय आपल्याला पर्याय नाही. सरकार आपल्याशी नीट वागणार नसेल तर सरकारच्या उरावर बसावे लागेल. माझ्यावर शंभर केसेस आहेत. तुम्ही म्हणाल, खिसे कापतो की काय तर नाही गेल्या २२ वर्षात अनेकांचे माज उतरवण्याचे काम केले आहे, असा घणाघात रविकांत तुपकर यांनी सरकारवर केला.

# ॲनिमेशन : कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता चेहरा

२८ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मूळ १८९२ सालच्या फ्रान्समध्ये दडलेले आहे, जेव्हा एमिल रेनॉ यांनी पॅरिसमधील 'म्युझियम ग्रेव्हिन' येथे 'झरपींळाशी डींळपर्शीशी' हा जगातील पहिला ॲनिमेटेड फिल्म शो सादर केला. त्या घटनेने मानवाच्या कल्पनाशक्तीला आणि दृश्य तंत्रज्ञानाला एक नवीन दिशा दिली. त्या स्मरणार्थ युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन संघटनेने (एएसआयएफए) २८ ऑक्टोबर हा दिवस ॲनिमेशनचा जागतिक उत्सव म्हणून मान्यता दिली. आज हा दिवस केवळ कलाविष्काराचा सन्मान नाही, तर मानवी सर्जनशीलता, सामाजिक परिवर्तन, आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक बनला आहे. ॲनिमेशन म्हणजे केवळ बालकांचे मनोरंजन नव्हे; ते एक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय माध्यम आहे. चलतचित्रांच्या माध्यमातून कल्पनांना जीवन देणारे हे कला-साहित्य मानवी मनोविज्ञान, सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ॲनिमेशन हे केवळ दृश्य कलारूप नसून, समाजातील विचारप्रवाह, सत्तासंबंध, लिंगभेद, वर्गभेद आणि सांस्कृतिक ओळख यांचे प्रतिबिंब आहे.



ॲनिमेशनचा इतिहास हा मानवाच्या कल्पनाशक्तीच्या प्रगतीचा इतिहास आहे. गुहेतील चित्रांपासून ते डिजिटल ३ऊ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्यांपर्यंतची ही उत्क्रांती म्हणजे सर्जनशीलतेचा प्रवास आहे. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' (Collective Memory) या संकल्पनेनुसार, प्रत्येक समाज आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण आठवणींमधून करतो. ॲनिमेशन ही त्या स्मृती जिवंत ठेवण्याची आधुनिक पद्धत आहे. पौराणिक कथा, लोककथा, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक विचार हे सर्व आज ॲनिमेशनच्या माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचत आहेत. भारतातील ॲनिमेशनचा प्रवास स्वतंत्र आणि बहुआयामी आहे. १९५६ साली माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या फिल्म विभागाने 'The Banyan Deer' हा पहिला भारतीय ॲनिमेशन चित्रपट प्रदर्शित केला. त्यानंतर राम मोहन, भिमसेन, जी.के. गोखले, कैलाश रेखी यांनी भारतीय ॲनिमेशनला जागतिक ओळख दिली. 'रामायण', 'हनुमान', 'पंचतंत्र कथा', 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'शक्तिमान', 'आर्यन' यांसारख्या ॲनिमेशन मालिका भारतीय संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक विचारांना दृश्यरूप देतात. या कलाकृतींनी ग्रामीण आणि नागरी समाजातील मुलांपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या ॲनिमेशन ही सामाजिकरणाची प्रक्रिया घडविणारे माध्यम आहे. एमिल दुर्खीम यांच्या मते, समाजातील प्रत्येक संस्था सामाजिक ऐक्य वाढवते. ॲनिमेशनमधून मुलां मध्ये नैतिक मूल्ये, सहानुभूती, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होते. उदा. 'पंचतंत्र कथा' अथवा 'जातक कथा' यांवर आधारित ॲनिमेशनमधून जीवनमूल्ये अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने सांगितली जातात. ॲनिमेशनमधील दृश्य आणि भावनिक सादरीकरणामुळे बालकांच्या मनावर त्या मूल्यांचा दीर्घकालीन प्रभाव पडतो. परंतु ॲनिमेशन केवळ मूल्यसंस्कारच रुजवत नाही; ते समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि विचारसरणी देखील प्रतिबिंबित करते. अनेक लोकप्रिय ॲनिमेशन चित्रपटांमध्ये पाश्चात्त्य विचारसरणी, पुरुषप्रधानता आणि उपभोगतावादी जीवनशैलीचे दर्शन घडते. पियरे बोर्द्यू (Pierre Bourdieu) यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) या संकल्पनेनुसार, समाजातील कलामाध्यमे ही सत्ता आणि वर्गसंघर्षाशी निगडित असतात. ॲनिमेशनही त्याला अपवाद नाही. डिस्ने, पिक्सार, ड्रीमवर्क्स यांसारख्या कंपन्यांनी जगभरात सांस्कृतिक कल्पना पसरवल्या पण त्या प्रामुख्याने पाश्चात्त्य मूल्यांवर आधारित आहेत. परिणामी, स्थानिक संस्कृती आणि परंपरा हळूहळू बाजूला पडतात.

तथापि, भारतीय ॲनिमेशनने या प्रवाहाला वेगळी दिशा दिली आहे. भारतीय निर्मात्यांनी लोककथांवर, आणि भारतीय नैतिक तत्त्वांवर आधारित कथा मांडल्या. 'छोटा भीम' सारख्या कथांमध्ये भारतीय सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेचे दर्शन घडते. अशा प्रकारे ॲनिमेशन समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ॲनिमेशन हे एक सांस्कृतिक संवादाचे साधन आहे. समाजातील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणणारे, त्यांच्या कथा आणि भावना मांडणारे हे माध्यम विविधता टिकवून ठेवते. उदा. आदिवासी जीवन, पर्यावरणीय प्रश्न, महिला सक्षमीकरण, आणि सामाजिक न्याय या विषयांवरील ॲनिमेशन चित्रपटांद्वारे सामाजिक जाणीवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात.

ॲडोर्नो आणि हॉर्कहायमर यांनी "Culture Industry' ही संकल्पना मांडताना दाखवले की, आधुनिक माध्यमे उपभोगवादी संस्कृती वाढवतात. ॲनिमेशन उद्योग याच प्रवृत्तीचे आधुनिक रूप आहे. लोकप्रिय पात्रांवर आधारित खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ, आणि मोबाइल गेम्स यांच्या विक्रीमुळे ॲनिमेशन हे भांडवलशाही संस्कृतीचे प्रमुख साधन बनले आहे. या प्रक्रियेत बालकांचे मन उपभोगाच्या संस्कृतीकडे आकर्षित होते. परंतु त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संदेशांसाठी ॲनिमेशनचा उपयोग केल्यास ते परिवर्तनाचे सामर्थ्यवान माध्यम ठरते. सध्या शैक्षणिक ॲनिमेशन ही संकल्पना अत्यंत लोकप्रिय झाली आहे. 'एडुटेनमेंट' (Education + Entertainment) या पद्धतीद्वारे विज्ञान, इतिहास, गणित आणि सामाजिक शास्त्रे यांची समज विद्यार्थ्यांना सोप्या, दृश्यप्रधान आणि रंजक स्वरूपात करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते. समाजातील ज्ञानाचे लोकशाहीकरण घडविण्याचे कार्य ॲनिमेशन प्रभावीपणे करत आहे. डिजिटल युगात ॲनिमेशनचे रूप अत्यंत व्यापक झाले आहे. ३ऊ आणि -ख यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन आता कल्पनेच्या मर्यादा ओलांडून वास्तवाशी मिसळत आहे. YouTube, Netflix, Hotstar, Amazon Prime सारख्या प्लॅटफॉर्म्सनी या कलारूपाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. भारतीय निर्माते जागतिक दर्जाचे ॲनिमेशन तयार करत आहेत आणि "Make in India' अंतर्गत ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होत आहेत. National Skill Development Corporation च्या अहवालानुसार, २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे २० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.



तथापि, ॲनिमेशनचा समाजावर होणारा परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी पाहिला पाहिजे. हिंसा, लिंगभेद, अति-उपभोग आणि अवास्तव कल्पना दाखवणाऱ्या ॲनिमेशनमुळे बालकांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे माध्यम साक्षरता (Media Literacy) वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यायोगे प्रेक्षक ॲनिमेशनमधील संदेशांची चिकित्सक दृष्टीने व्याख्या करू शकतील. समाजशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात ॲनिमेशन हे 'आरसा' आहे, जो समाजातील वास्तव दाखवतो, आणि कधी कधी ते वास्तव बदलण्याची प्रेरणाही देतो. सामाजिक असमानता, लिंगभेद, पर्यावरणीय संकट, युद्ध, शांती, आणि मानवतेचे प्रश्न हे सर्व ॲनिमेशनच्या माध्यमातून संवेदनशील आणि प्रभावीपणे मांडता येतात. त्यामुळे ॲनिमेशन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे.

२८ ऑक्टोबरचा 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' आपल्याला आठवण करून देतो की मानवी कल्पनाशक्ती अमर्याद आहे. ती समाजातील बंधने मोडून नवीन विचार, नवीन संस्कृती आणि नवीन दृष्टिकोन निर्माण करू शकते. ॲनिमेशन ही केवळ कला नाही, ती कल्पनाशक्तीच्या समाजशास्त्राचे दृश्य रूप आहे, जिथे तंत्रज्ञान आणि मानवी भावना एकत्र येतात, आणि जिथे प्रत्येक रंग, प्रत्येक चळवळ, प्रत्येक पात्र समाजाच्या आरशात नवीन प्रतिबिंब निर्माण करते. आजच्या डिजिटल जगात, जिथे माहिती आणि प्रतिमा सर्वत्र उपलब्ध आहेत, तिथे ॲनिमेशन समाजाला विचार करण्यास, संवेदनशील होण्यास आणि बदल घडविण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच ॲनिमेशनकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, ते मानवी कल्पनाशक्तीचे सामाजिक माध्यम म्हणून ओळखले पाहिजे. हाच या दिवसाचा खरा संदेश की ॲनिमेशन म्हणजे मानवी विचारांचा, संस्कृतीचा आणि समाजाचा अखंड प्रवास आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे, मो. क्र. ९९६०१०३५८२**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

## १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन

## तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्त्यांचा समावेश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह – 'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फ ब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या



सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत.

ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच ''मुंबई क्लायमेट वीक'' कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे.

यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे.

''मुंबई क्लायमेट वीक'' कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.

तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले.

मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.

'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी कार्यक्रमाबद्दल माहिती देताना सांगितले की, ''मुंबई क्लायमेट वीक हा महाराष्ट्र आणि भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. वातावरणीय बदलाला तोंड देण्यासाठी लोकसहभागावर आधारित असे शाश्वत आणि समावेशक उपाय या परिषदेतील मंथनातून तयार होतील.''


या उपक्रमाचे नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असणार असून क्लायमेट ग्रुप, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिस्ट्यूट (इंडिया), एव्हरसोर्स, एचटी पारेख फाउंडेशन, युनिसेफ, शक्ती फाउंडेशन, रेनमॅटर फाउंडेशन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या संस्था यात सहभागी होणार आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयातील यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे, प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई, जलज दाणी आदी यावेळी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### भरधाव कंटेनरची तीन गाड्यांना धडक








**दैनिक आपला विदर्भ**

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : मुंबई-गोवा महामार्गावर भोस्ते घाटाच्या पायथ्याशी आज भीषण अपघात घडला. गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव कंटेनरने समोर निघालेल्या व येणाऱ्या अशा तीन चारचाकी वाहनांना आणि एका दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात महिंद्रा पिकअप, टाटा नेक्सॉन, स्विफ्ट डिझायर आणि एका दुचाकीचा समावेश होता. या अपघातात तिन्ही चारचाकी गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, स्विफ्ट डिझायर कारमधून प्रवास करणारे दोघेजण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये कारचा पूर्णपणे चेंदामेंदा झाल्याचे पहावयास मिळाले. सुदैवाने या कारमधून प्रवास करणारे दोघेजण बचावले असले, तरी त्यांना दुखापत झालेल्या ची माहिती समोर येत आहे.

या अपघाताची माहिती मिळतात तात्काळ स्थानिक नागरिकांनी या कारमधील प्रवाशांना वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात हलवले. या अपघातानंतर महामार्गावर दोन्ही बाजू वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र पहावयास मिळत होते. तर महामार्गावर कंटेनर ट्रक मधील केमिकल सदृश्य लिक्वीड देखील सर्वत्र पसरले होते.

### अप्पी आमची कलेक्टर फेम अभिनेत्रीचा झाला साखरपुडा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :'अप्पी आमची कलेक्टर' ही झी मराठीवरील लोकप्रिय मालिकेची नायिका शिवानी नाईकने नुकताच आपला साखरपुडा केलाय. मालिकेत 'अप्पी'ची भूमिका साकारून प्रेक्षकांची लाडकी बनलेली शिवानी आता खऱ्या आयुष्यात नव्या प्रवासाला सुरुवात करणार आहे. अभिनेत्री येत्या काही दिवसांत लोकप्रिय मराठी अभिनेता अमित रेखीशी लग्नगाठ बांधणार आहे. या दोघांच्या साखरपुड्याचे फोटो नुकतेच सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

अमित रेखीबद्दल सांगायचं झालं तर, तो मराठी टीव्ही क्षेत्रातील ओळखीचा चेहरा आहे. 'भाग्य दिले तू मला' या कलर्स मराठीवरील मालिकेमुळे त्याला प्रसिद्धी मिळाली.त्यानंतर 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' या मालिकेत त्याने मकरंदची भूमिका साकारली. सध्या तो 'पिंगा गं पोरी पिंगा' या मालिकेत प्रमुख भूमिकेत झळकत आहे.

## अहिल्यानगर येथील सराफ बाजारात तब्बल दोन किलोपेक्षा अधिक (२०२१ ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि चोख सोने घेऊन सहा कारागीर बेपत्ता

**दैनिक आपला विदर्भ**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : अहिल्यानगर येथील सराफ बाजारात तब्बल दोन किलोपेक्षा अधिक (२०२१ ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि चोख सोने घेऊन सहा कारागीर बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या सोन्याची किंमत सुमारे १ कोटी १ लाख ५ हजार रुपये इतकी आहे. या घटनेमुळे अहिल्यानगर सराफ बाजारात मोठी खळबळ उडाली असून सराफ व्यावसायिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.



याप्रकरणी कृष्णा जगदीश देडगावकर (वय ३२) यांनी सोमवारी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिपनकर माजी, सोमीन बेरा ऊर्फ कार्तिक, सोमनाथ सामंता, आन्मेश दुलोई, सत्तु बेरा आणि स्नेहा बेरा या सहा संशयित कारागिरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. देडगावकर ज्वेलर्सचे मालक कृष्णा देडगावकर आणि त्यांचा भाऊ प्रतीक देडगावकर यांच्या दुकानात चार कारागीर काम करत होते, तर इतर दोन कारागीर शेजारील दुकानात काम करत होते. रविवारी सायंकाळी कारागीर दिपनकर माजी जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर चौकशी केली असता सर्व सहा कारागीरांचे मोबाईल बंद असल्याचे आणि त्यांची घरे कुलूपबंद असल्याचे आढळून आले. अखेर हे कारागीर सोन्याचे दागिने घेऊन पळून गेल्याचे निष्पन्न झाले. चोरीस गेलेल्या सोन्यामध्ये कृष्णा देडगावकर, प्रतीक देडगावकर यांच्यासह आठ सोनार व्यावसायिकांचे सोने समाविष्ट आहे. गेल्या काही महिन्यांत या कारागीरांनी विश्वास संपादन करून ही लबाडीने चोरी केली.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी सांगितले की, संशयित कारागीरांचा शोध घेण्यासाठी पथके कार्यरत आहेत, परंतु त्यांचे मोबाईल बंद असल्याने तपासात अडचणी येत आहेत. सराफ बाजारातील या मोठ्या चोरीमुळे पोलिसांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. कोतवाली पोलिसांच्या पथकासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देखील समांतर तपास करीत असून लवकरच या प्रकरणातील आरोपी जेरबंद होतील.

पान १ वरून...

## उमेदवारांना जात वैधतेसाठी मुदतवाढ

**आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतलेले महत्वाचे निर्णय–**

नियोजन विभाग– विकसित महाराष्ट्र–२०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला मान्यता. विकसित महाराष्ट्र–२०४७ च्या अंमलबजावणीसाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट (व्हीएमयू) गठीत करणार. राज्यातील नागरिकांकडून मते व प्रतिसाद मागवून, त्यांचे एआय-आधारित विश्र्लेषण करून डॉक्युमेंट तयार. राज्य व जिल्हा पातळीवरील १६ संकल्पना निश्र्चित. प्रगतीशील, शाश्र्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या अंतर्गत १०० उपक्रम निश्र्चित.

गृह विभाग– सोलापूर–तुळजापूर–उस्मानाबाद या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चास व राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्शयानुसार अधिकचा निधी देण्यास मान्यता

सामान्य प्रशासन विभाग– सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार. सचिव (राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणुक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क) / Secretary (Protocol, FDI, Diaspora Affairs and Outreach) अशा पदनाम विस्तारास मान्यता. याशिवाय परकीय थेट गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय संपर्क आणि परदेशस्थ नागरिकांचे विषय अशा तीन नवीन कार्यासनांच्या निर्मितीस आणि या कार्यासनांसाठी आवश्यक पदांना मंजुरी

नगरविकास विभाग– महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी

ग्रामविकास विभाग– ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश २०२५ काढण्यास मान्यता

विधि न्याय विभाग– धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालय. याशिवाय शासकीय अभियोक्ता कार्यालय होणार. या दोन्हींसाठी आवश्यक पदांना व खर्चाच्या तरतुदीस मंजुरी.

महसूल विभाग– वाशिम जिल्ह्यातील सुविदे फाउंडेशन, रिसोड यांना मौजे करडा ( ता. रिसोड) येथील २९.८५ हे. आर जमीन. या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नाममात्र दराने (एक रुपया) पुढील ३० वर्षाकरिता नुतनीकरणास मान्यता

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चौकशीचे आदेश चांगले; पण आधीच्या चौकशांचे काय झाले? : प्रकाश आंबेडकर

**दैनिक आपला विदर्भ**

**परभणी/प्रतिनिधी** : वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे परभणी जिल्हा दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना विविध विषयांवर सरकारवर टीका केली.

आंबेडकर म्हणाले, ''वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले ही चांगली गोष्ट आहे. पण यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाळीस आमदारांच्या चौकशीचे आदेश दिले होते. त्या आमदारांची चौकशी आणि रिकव्हरीसंदर्भात आदेशही निघाले होते. मात्र, त्याचे पुढे काय झाले याचा खुलासा फडणवीस यांनी करावा.''

ते पुढे म्हणाले, ''साखर कारखानदार हे कारखान्याचे मालक नसून त्या कारखान्यांतील ९० टक्के निधी हा शासनाचा असतो. त्यामुळे नफ्यातून शासनाचा हिस्सा घेण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे. जर सरकार अंमलबजावणी करत नसेल, तर हे सरकार किती तकलादू आहे हेच स्पष्ट होते.''

पोलीस विभागावर टीका करत आंबेडकर म्हणाले, ''पोलीस खातं हे बदमाशांचं खातं बनलं आहे.




साताऱ्यातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येस पोलीस अधिकारी जबाबदार आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाप्रमाणेच या प्रकरणातही दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.''

ओबीसी आणि मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी सरकारवर फसवणुकीचा आरोप केला. ''सरकार ओबीसींना सांगते की हैदराबाद गॅझेटसंदर्भातील शासन निर्णय रद्द करू, पण कोर्टात त्याच निर्णयाचे समर्थन करते. त्यामुळे सरकार दोन्ही समाजांची फसवणूक करत आहे,'' असा आरोप आंबेडकर यांनी केला.

राज्यातील अतिवृष्टी आणि सरकारच्या मदत पॅकेजवर टीका करत त्यांनी म्हटले, ''खरिप पिकांचे प्रचंड नुकसान झालं, सरकारने ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली. पण हा आकडा रतन खत्री यांच्या मटक्यासारखा वाटतो,'' अशी उपरोधिक टीका त्यांनी केली.

**–प्रकाश आंबेडकर, अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी**

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडूंनी लावला दम!

## महायुती सरकारची कोंडी, रस्त्यावरच ठोकला मुक्काम

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर शासनाला आजवर आठवेळा स्मरणपत्र देण्यात आले. त्याची कोणतीच दखल शासनाकडून घेण्यात आली नाही. त्यामुळे आता कर्जमाफीचा शासन आदेश निघाल्याशिवाय माघार घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा माजी राज्यमंत्री व प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिला. बच्चु कडू यांनी सरकारी आदेशाशिवाय हटणार नाही असा इशारा देऊन रस्त्यावरच ठाण मांडले असल्याने महायुती सरकारची चांगलीच कोंडी झाली आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी बंगल्यावर धडक देण्याचा तसंच उद्या दुपारी १२ वाजता रेल्वे बंद करुन 'भारत बंद' करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसाठी महाऐल्गार आंदोलन पुकारले असून अमरावती जिल्ह्यातून आंदोलनकर्ते आज सायंकाळी साडेसहा वाजता नागपूरच्या वेशीवर धडकले. या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजू शेट्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे (क्रांतीकारी) अध्यक्ष रवीकांत तुपकर, अजित नवले यांच्यासह अनेक शेतकरी नेते सहभागी झाले आहेत. या मोर्चात स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह विविध संघटना सहभागी झाल्या आहेत. या मोर्चामध्ये ५०० पेक्षा अधिक ट्रॅक्टर त्यांच्यासोबत होते.



त्यामुळे बेलोरा ते नागपूर मार्गावर ठिकठिकाणी वाहतूक प्रभावित झाली होती.

बच्चू कडू म्हणाले, शासनाने विधानसभा निवडणूकीपूर्वी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले. परंतू त्याची पूर्तता करण्यात आली नाही. शासनाने शेतकऱ्यांना गृहित धरल्याने शेतीक्षेत्रासमोर विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. अतिवृष्टीच्या भरपाईत देखील दुजाभाव करण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा दावा करण्यात आला होता. उत्पन्न तर नाही परंतू खत, डिझेल, पेट्रोल दरात वाढीच्या माध्यमातून त्यांचा उत्पादकता खर्च मात्र दुप्पट, तिप्पट करण्यात आला. मजूरी खर्चातही मोठी वाढ झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गणीत कोलमडले आहे. त्यामुळेच शेती कामांचा समावेश रोजगार हमी योजनेत व्हावा, अशी मागणी आहे. त्याची देखील पूर्तता गेल्या अनेक वर्षात करण्यात आली नाही. दिव्यांगाचे मानधन वाढीचा मुद्दाही प्रलंबीत आहे. त्यासोबतच मेंढपाळही अनेक सोयी सुविधांपासून वंचीत आहे. अशा सर्व आश्वासनांची पूर्तता शासनाने तत्काळ करावी, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली. शक्तीपीठसाठीचे सक्तीचे भुसंपादन रद्द करुन त्याऐवजी हा पैसा शेतकऱ्यांच्या कल्याणार्थ वापरावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### मुख्यमंत्र्यांच्या घरावर देणार धडक

आंदोलनाची दखल न घेतल्यास मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नागपूरातील निवासस्थानावर सायंकाळी चार ते पाच वाजता धडक देणार असल्याचा इशारा कडू यांनी दिला होता. परंतू सायंकाळी साडेसहा वाजता त्यांचा ताफा नागपूरात दाखल झाला. त्यामुळे नियोजनीत आंदोलन होऊ शकले नाही.आंदोलनात शेतकऱ्यांचा चेतवणारे भाष्य बच्चु कडू यांनी नागपूर पोहोचताच केले. कर्ज मुक्ती हाती घ्यायची असल्यास आपल्याला निर्धार करावा लागेल. त्यासाठी केवळ नागपूरच नव्हे तर कधी महाराष्ट्रात चक्काजाम करण्याची वेळ आल्यास तुम्ही तयार रहा. या खेरीज शासनाने न ऐकल्यास संपूर्ण देशभर आपण आंदोलन करु, असे बच्चु कडू यांनी नमूद केले. आपल्या या आंदोलनाच्या निर्णयामुळे आपल्या आयुष्यभराची सोय होईल. ही लढाई केवळ कर्ज मुक्ती नाही, केवळ हमीभावासाठी नसून शेतकऱ्यांच्या जीवासाठी अन् संपूर्ण शेतकरी समाजासाठी आहे. पैसा नाही असे सरकार म्हणत असल्यास एकट्या मुंबईसाठी बजेटमध्ये एक ते दीड लाख कोटींची तरतुद कुटून करण्यात आली, हे सरकारने सांगावे, असा प्रश्न देखील शासनाला केला.

# नंदुरबारच्या माजी खासदार डॉ. हीना गावीत यांचे निलंबन रद्द

## कोल्हापूर, सातारा, अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते भाजपामध्ये

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : कोल्हापूर, लातूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. कराडच्या माजी नगराध्यक्षा आणि नगरसेविका शारदा जाधव, कराड जनशक्ती आघाडीचे अध्यक्ष व माजी नगरसेवक अरुण जाधव, कोल्हापूरचे दंत चिकित्सक डॉ. विजयसिंह गायकवाड यांनी त्यांच्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते आ. डॉ. विजयकुमार गावीत, आ. डॉ.अतुलबाबा भोसले, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. मनोज घोरपडे, लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, लातूर जिल्हा प्रभारी किरण पाटील, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, माजी आमदार वैभव पिचड आदी उपस्थित होते. नंदुरबारच्या माजी खासदार डॉ. हीना गावीत यांच्यावरील निलंबनाची कारवाई रद्द करण्यात आल्याचे पत्र यावेळी त्यांना देण्यात आले. लातूर जिल्ह्यातील अहमदपूरचे माजी आमदार बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, ज्ञानोबा बडगीरे, डॉ. सिध्दार्थकुमार सुर्यवंशी यांच्यावरील निलंबन कारवाई रद्द केल्याचे पत्रही यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या




सक्षम नेतृत्वाखाली 'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार समाजातील सर्व घटकांची उन्नती वेगाने होत आहे. या दोघांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊन भाजपाच्या विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवत जनतेशी नाळ जुळलेल्या मातब्बर नेत्यांचा तसेच युवा कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश झाला आहे. राष्ट्रहिताच्या कार्यात आपलेही योगदान असावे या हेतूने अनेकांचा ओढा भाजपाकडे वाढत आहे. त्यांच्या साथीने पक्षाची ताकद वाढेल असे श्री. चव्हाण म्हणाले. आ. अतुलबाबा भोसले यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे कराडमधील प्रवेश शक्य झाल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले. कराड आणि मलकापूर या दोन्ही नगर परिषदा भाजपाच्या ताब्यात येतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. लातूर मनपाचे माजी सभापती गिरीश पाटील, माजी नगरसेवक गौरव काथवटे, धाराशीव जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष विजयकुमार सोनवणे, उमरगा पं. स. माजी सभापती अक्षरा सोनवणे, हिंदू खाटीक महासंघाचे माजी अध्यक्ष जयंतराव काथवटे, औसाचे माजी नगराध्यक्ष मंथन मिटकरी यांनी काँग्रेसमधून भाजपा मध्ये प्रवेश केला.

भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये कराडचे माजी नगराध्यक्ष अशोक भोसले, माजी नगरसेवक आनंद पालकर, माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांचे निकटवर्तीय शिवाजी पवार, माजी नगरसेविका चंदाराणी पवार, जनशक्ति आघाडीचे उपाध्यक्ष अतुल शिंदे, स्व. जयंत जाधव यांचे सुपुत्र माजी नगराध्यक्ष डॉ. आशुतोष जाधव यांचा समावेश आहे.

भाजपात प्रवेश केलेल्यांमध्ये नंदुरबारच्या जिल्हा परिषद माजी सदस्य व माजी भाजपा जिल्हा अध्यक्ष नागेश पाडवी, जि. प. माजी सदस्य व माजी शिवसेना जिल्हा प्रमुख किरसिंग वसावे, जिल्हा परिषद माजी सदस्य प्रताप वसावे, जिल्हा परिषद माजी सदस्य नितेश वळवी, जिल्हा परिषद माजी सभापती हेमलता शितोळे, जिल्हा परिषद माजी सदस्य अशोक राऊत, अभिषेक सावरीकर, काँग्रेसचे पदाधिकारी अक्षय बलकवडे, शरद पवार गटाचे युवक प्रदेश सरचिटणीस किरण मराठे, अजिंक्य गायकवाड यांचा समावेश आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षा, जिल्हा परिषद माजी सदस्या सुनिता भांगरे आणि माजी आमदार यशवंत भांगरे यांचे सुपुत्र अकोले पं. स. माजी सदस्य दिलीप भांगरे, घाटघर सरपंच लक्ष्मण पोकळे, सरपंच एकनाथ सारुखे, भंडारदरा सरपंच अनिता खाडे, रतनवाडी सरपंच बाळासाहेब जडे, पेणशेतच्या माजी उपसरपंच हुंदा पद्मेरे, भंडारदरा माजी सरपंच सुमन खाडे, संजय बांडे, नंदिनी फतवे आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला. कराड उत्तर तालुक्यातील रहिमतपूरचे नगरसेवक विक्रमसिंह माने, माजी उपनगराध्यक्ष विकास तुपे, प्रशांत भोसले, काँग्रेस सेवा दल प्रदेश सरचिटणीस उमेश साळुंखे, कल्याणराव डुबल आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला.

### सैनिकी सभामंडप भाड्याने उपलब्ध; माजी सैनिक, विधवा व अवलंबितांना विशेष सवलत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : येथील सर्व सुविधा उपलब्ध असलेले, सुसज्ज व भव्य सैनिकी सभामंडप आता सर्वसामान्य नागरिकांसाठी भाड्याने उपलब्ध करण्यात आले आहे. हा सभामंडप जिल्ह्याच्या मध्यवर्ती भागात, एस.टी. बस स्थानकापासून केवळ २५मीटर अंतरावर असून लग्न समारंभ, वाढदिवस, सभा तसेच विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी वापरता येणार आहे.

सदर सभामंडप सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या, योग्य व माफक दराने भाड्याने दिला जाणार असून, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा आणि अवलंबितांना विशेष सवलत देण्यात येणार आहे. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### सैनिक कल्याण विभागात लिपिक टंकलेखक पदांची भरती; माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सैनिक कल्याण विभाग व त्याच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक टंकलेखक(गट-क) या एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक माजी सैनिक उमेदवारांनी ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

एकूण पदांपैकी एक पद हे अंपग संवर्गासाठी राखीव असून, किमान ४० टक्के अंपगत्व असलेल्या उमेदवारांमधून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन गुणवत्ता व उपलब्धतेनुसार भरती केली जाणार आहे. सदर भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन (T.C.S-ION) यांच्या माध्यमातून पार पडणार असून अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील रिर्सोसेस टॅब-रिक्रूटमेंट टॅब या पर्यायामधून सादर करावेत. अर्ज प्रक्रिया दि. १४ ऑक्टोंबरपासून सुरु झाली असून अंतिम मुदत दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर वेबलिंक बंद होईल, यांची नोंद घ्यावी, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

### अनैतिक संबंधाच्या संशयातून पतीने केली पत्नीची हत्या, पाच वर्षापूर्वी झाला होता प्रेमविवाह

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून संतापलेल्या पतीने लोखंडी फावड्याने वार करून पत्नीची हत्या केल्याची घटना नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा तालुक्यात घडली आहे. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. आरोपी पती हा मूळचा ओडिशा राज्यातील असून कामाच्या शोधात ते हिंगणा तालुक्यात एका भाड्याच्या खोलीत राहात होता अशी माहिती एमआयडीसी पोलिसांनी दिली. पाच वर्षापूर्वी आरोपीचा प्रेमविवाह झाला होता आणि तो हिंगणा तालुक्यात एका गॅरेजमध्ये काम करत होता. एक महिन्यापूर्वी पत्नी ही इंस्टाग्रामवरील मित्रासोबत घरून अहमदाबाद येथे पळून गेली होती.



### राष्ट्रीय महामार्गावर ट्रकला अचानक आग, मोठा अनर्थ टळला

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** : नांदेड-अकोला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वर सोमवारी संध्याकाळी चालत्या ट्रकमध्ये अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी सुमारे ७.३० वाजता समृद्धी महामार्गावरील पुला जवळ अकोल्याहून हिंगोलीकडे जाणाऱ्या ट्रक क्रमांक चक-१८ इ- ०५५४ मध्ये अचानक शॉर्टसर्किटमुळे ठिणगी उडाली आणि त्यातून वाहनाने पेट घेतला.

ट्रकला आग लागल्याचे लक्षात येताच ट्रकचालक अब्दुल हसीब वय ४५ वर्षे राहणार वाशिम यांनी वाहन रस्त्यावर थांबवून तात्काळ डायल ११२ वर संपर्क साधला. माहिती मिळताच मालेगाव पोलिस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल सत्यप्रकाश सुपारे, चालक पोलिस कॉन्स्टेबल विलास पवार, महामार्ग सुरक्षा पथक अमानीचे हेड कॉन्स्टेबल सुधांशू पाचपिले, कॉन्स्टेबल अमोल कापडी तसेच एमएसएफ कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व परिस्थितीचा आढावा घेतला.पोलिस पथकाने मालेगाव नगरपंचायतच्या अग्निशमन दलाच्या मदतीने आग नियंत्रणात आणली.

दरम्यान, रस्त्यामध्ये उभा असलेला ट्रक बाजूला केल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. या घटनेत कोणीही जखमी किंवा जीवितहानी झाली नाही ही एक चांगली बाब आहे.

# शिक्षणाद्वारे आत्मनिर्भरतेचा प्रकाश निर्माण करावा -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## अनाथ व असुरक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : अनाथ बालकांच्या आयुष्यात शिक्षणाद्वारे आत्मनिर्भरतेचा प्रकाश निर्माण करणे हीच खरी सेवा आहे, असे प्रतिपादन करत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व विभागांना समन्वयातून कार्य करून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

कोविड काळात अनाथ ठरलेल्या तसेच १८ वर्षांखालील दिव्यांग आणि भावनिकदृष्ट्या असुरक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी बुलढाणा जिल्ह्यात एक विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश अशा बालकांचे शिक्षण, आरोग्य, मानसिक आणि सामाजिक पुनर्वसन करून त्यांना आत्मनिर्भर आणि सुरक्षित बनविणे हा आहे.

बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी वर्षा डिंगळे, बालसंरक्षण अधिकारी, तसेच पोलिस, शिक्षण, आरोग्य आणि महिला व बालविकास विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील अशा बालकांची सध्यस्थिती तपासून त्यांच्या शिक्षण, आरोग्य व पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी संबंधित सर्व विभागांना समन्वयातून कार्य करण्याचे निर्देश देत कोणतेही बालक शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तत्काळ राबविण्याचे आदेश दिले. तसेच अशा उपक्रमामुळे जिल्ह्यातील दिव्यांग, अनाथ व असुरक्षित बालकांच्या जीवनात शिक्षणाच्या माध्यमातून नव्या आशेचा व आत्मनिर्भरतेचा प्रकाश निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

